# जाहीर प्रकटन

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च / एप्रिल २०२२ च्या सुधारित परीक्षा वेळापत्रकानुसार एम. एस्सी. भाग १ सत्र २ (Sub Code 79246/84510) Physical Chemistry – II हा पेपर दि. २३/०८/२०२२ रोजी दु. ०४. ०० ते ०५. ०० या कालावधीत सुव्यस्थितरित्या संपन्न झालेला आहे. याबाबत विद्यापीठ परीक्षा विभागाद्वारे सदरचा पेपर रद्द झालेबाबत कोणतेही परिपत्रक निर्गमित केलेले नाही. तथापि काही अज्ञात व्यक्तीने या परीक्षेबाबत या विषयाबाबत बनावट परिपत्रक/ बातमी समाजमाध्यमामध्ये प्रसारित केली आहे. यामुळे परीक्षा केंद्र व परीक्षार्थी यांच्यामध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. सबब सदरच्या जाहीर निवेदनाद्वारे सर्व परीक्षा केंद्रांना / परीक्षार्थींना कळविण्यात येते कि, अज्ञात व्यक्तीकडून तयार केलेले बनावट परिपत्रक/ बातमी दुर्लक्षित करण्यात यावी. अशा अज्ञात व्यक्तीवर विद्यापीठ प्रशासनामार्फत सायबर सेल येथे गुन्हा नोंदविण्यात येऊन कडक कार्यवाही करण्यात येत आहे.

विधी अभ्यासक्रम दि. २६/०७/२०२२ रोजी झालेला Intellectual Property Law (Sub Code 74830/74866) हा पेपर काही अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्यात आला आहे. सदर पेपर दि. २९/०८/२०२२ रोजी दु. ०१. ०० ते ०२. ०० या वेळेमध्ये संबंधित विधी परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. याबाबत संबंधित विधी महाविद्यालयांना दि. २२/०८/२०२२ रोजी पत्रान्वये काळविणेत आलेले आहे. तथापि झालेली परीक्षा रद्द करून पुर्न:परीक्षा घेऊ नये अश्या आशयाची काही विद्यर्थ्यांची पत्रे विद्यापीठाकडे येत आहेत. याबाबत सर्व विधी महाविद्यालये व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते कि, दि. २९/०८/२०२२ रोजी दु. ०१. ०० ते ०२. ०० या वेळेमध्ये Intellectual Property Law या विषयाची परीक्षा होणार असून या परीक्षेस गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी .

S/dn.

संचालक

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

कोल्हापूर

दि. २७/०८/२०२२